प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# महाराष्ट्र-कर्नाटकमध्ये 'रवळनाथ'ने उभारला सलोख्याचा सेतू : डॉ. मुळे

## 'रवळनाथ'च्या १४ व्या चिक्कोडी शाखेचा उद्घाटन समारंभ

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

रवळनाथ हौसिंग फायनान्स ही केवळ वित्तीय संस्था नाही. सामाजिक सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात समाजात परिवर्तन आणणारी सर्वंकष संस्था आहे. चिक्कोडी शाखा ही सीमाभागातील नव्या पर्वाची नांदी असून, रवळनाथने महाराष्ट्र-कर्नाटकमध्ये सलोख्याचा सेतू उभारला आहे, असे प्रतिपादन विदेश मंत्रालयाचे माजी राजदूत व सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी व्यक्त केले. श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि., आजरा (मल्टि-स्टेट) प्रधान कार्यालय गडहिंग्लज या संस्थेच्या चिक्कोडी येथील १४ व्या शाखेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

निडसोशी येथील श्री दुरदुंडेश्वर सिद्धसंस्थान मठाचे पंचम शिवलिंगेश्वर महास्वामी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. श्री साई सौहार्द को-ऑप. सोसायटी लिमिटेडचे संस्थाध्यक्ष जगदीश कवटगीमठ, 'रवळनाथ'चे संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले, उपाध्यक्षा मीना रिंगणे, सीईओ डी. के. मायदेव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी शिवलिंगेश्वर महास्वामी यांच्या हस्ते चिक्कोडी शाखेचे फित सोडून उद्घाटन व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन, दीपप्रज्वलन झाले. चिक्कोडी शाखा अध्यक्ष अॅड. जयपाल बोके यांनी स्वागत केले.



चिक्कोडी : येथे श्री रवळनाथ शाखेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. ज्ञानेश्वर मुळे. सोबत शिवलिंगेश्वर महास्वामी, एम. एल. चौगुले व मान्यवर.

सुनील काजगर यांनी अतिथी परिचय करून दिला. आर्किटेक्ट मनजित नागरमुन्नोळी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्रा. डॉ. गुरुराज येळवट्टीमठ, सुनील काजगर, मल्लिकार्जुन मुगेरी, प्रा. भिमाप्पा माळी, प्रशांत वरदाई, महेंद्र शहा, प्रा. डॉ. जयश्री नागराळी, शाखाधिकारी गोविंद जोशी, प्रा. विजयकुमार घुगरे, महेश मजती, डॉ. संजय चौगुले, रेखा पोतदार व सभासद, नागरिक उपस्थित होते. प्रा. डॉ. जयश्री नागराळी यांनी आभार मानले. 'वंदे मातरम' गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

My Kolhapur Edition
Dec 25, 2024 Page No. 09
Powered by: erelego.com